तरुण भारत
Amcha Pune | 2026-08-07 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात सायबर सुरक्षेविषयीजागृती

**पुणे, ६ ऑगस्ट**

दिनानाथ मंगेशकर रुग्णालयातील कर्मचारी वर्गासाठी सायबर सुरक्षेविषयी जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. डिजिटल युगात वाढत असलेल्या सायबर फसवणुकीच्या घटनांच्या पृष्ठभूमीवर सुरक्षित ऑनलाईन व्यवहार, फिशिंग, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, यूपीआय फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षितता तसेच मजबूत पासवर्डचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कर्मचाऱ्यांनीही प्रश्न विचारून सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हा उपक्रम क्विक हील फाऊंडेशन यांच्या 'सायबर शिक्षण, सायबर सुरक्षेसाठी' या अभियानांतर्गत आयोजित करण्यात आला. या सत्रात महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थिनी स्वाती बारदापूरे आणि अनुभा साठे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सध्याच्या काळात घडणाऱ्या विविध सायबर गुन्ह्यांची माहिती देत फिशिंग, बनावट वेबसाइट्स, ओटीपी व यूपीआय फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षितता तसेच मजबूत पासवर्ड याबाबत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले आणि सायबर फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी आवश्यक खबरदारी सांगितली.

या उपक्रमासाठी संस्थेच्या प्राचार्या डॉ. अनघा वैद्य आणि शिक्षक समन्वयक प्रा. मनाली सपकाळ यांचे सहकार्य लाभले. रुग्णालय प्रशासनानेही या उपक्रमास सहकार्य केले.